|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

## प्रशासन विभाग

## जाहिरात क्र. कंत्राटी (शिक्षकेतर) ५/२०२४
## थेट मुलाखती (Walk in Interview)

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी अर्हताधारक उमेदवारांच्या थेट मुलाखतीचे (Walk in Interview) आयोजन करण्यात येत असून, या संदर्भात मुलाखतीचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

शैक्षणिक अर्हता, अनुभव, नेमणूक कालावधी, कामकाजाचा विभाग, इतर सुचना इ. तपशिल येणेप्रमाणे :-

| अ. क्र. | पद | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव | नेमणूक कालावधी | दरमहा एकत्रित वेतन | काजकाजाचा विभाग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | **महिला** वैद्यकिय अधिकारी | ०१ | Bachelor's Degree (M.B.B.S.) of a Statutory University. Preference will be given to the candidate possessing P.G. Degree or Diploma<br>**OR**<br>Bachelor's Degree (B.A.M.S.) of a Statutory University. Preference will be given to the candidate possessing P.G. Degree or Diploma | Three Years experience of Medical Practitioner after completion of Internship. | ११ महिने | रु.४०,०००/- (For M.B.B.S.)<br>रु.३५,०००/- (for B.A.M.S.) | आरोग्य केंद्र |
| ०२ | ESD | 01 | M.B.A.(Finance) + C.A. attempt Final one group passed. | Experience of work in SAP environment of 3 years. | ११ महिने | रु.३०,०००/- | वित्त विभाग |

विहित नमुन्यातील अर्ज कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहतील, अर्हताधारक उमेदवारांनी वेळोवेळी विद्यापीठाच्या Website वर प्रसिध्द करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार पदनिहाय आवश्यक त्या दस्तऐवजांच्या मुळ, स्वाक्षांकित प्रतीसह संलग्न केलेला मुळ अर्ज अर्जासह (सोबत इतर सहा अर्ज यांना दस्तऐवजांच्या प्रती जोडू नयेत) विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, व्यवस्थापन परिषद सभागृह या ठिकाणी स्वखर्चाने **बुधवार, दि.३१/०७/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजेपुर्वी** उपस्थित रहावे.

**इतर सुचना :-**

१. अर्जदाराने अर्जावर स्वत:चे नजीकच्या काळात काढलेले पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र चिकटवून स्वस्वाक्षांकित करावे.
२. सदर पदांसाठी मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक राहील.
३. भरती प्रक्रियेशी संबंधित अधिकारी व सेवकांवर उमेदवाराने कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.
४. अर्जासोबत सर्व प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती स्वाक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे.
५. मुलाखतीसाठी अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
६. उमेदवाराचे वय **किमान २४ वर्षे व कमाल ५० वर्षे** असावे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा शासन नियमानुसार राहील. **७० वर्षापर्यंत वय असलेले सेवानिवृत्त अधिकारी सदर मुलाखतीस उपस्थित राहू शकतील.**
७. उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती व कागदपत्रे खोटी असल्यास किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रदद करण्यात येईल.
८. अर्जाची स्विकृती किंवा तो नाकारणे याबाबत विद्यापीठामार्फत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.
९. जाहिरातमध्ये नमुद पदे भरणे किंवा न भरणे याचा हक्क विद्यापीठाने राखून ठेवला आहे.
१०. जाहिरातीतील पदांच्या वेतनात, अनुभव शिथिलता आणि पदसंख्या यात बदल करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेले आहेत.

कृ.मा.प.

११. विद्यापीठ प्रशासन आपल्या कामाचा कालावधी, कामाचे स्वरुप व कामाचे स्थान यात बदल करण्याचे अधिकार राहतील.
१२. सदर पदाची नेमणुक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल, त्यांना शासकीय कर्मचारी म्हणून दर्जा असणार नाही.
१३. सदर नेमणुक करार पध्दतीने प्रथमत:११ महिन्यांसाठी करण्यात येईल. ११ महिन्यानंतर विद्यापीठास सदर पदाच्या सेवेची आवश्यकता वाटल्यास कराराची मुदत केलेल्या कामकाजाचे गुणवत्तेचा आढावा घेवून वेळोवेळी वाढविता येईल. तथापि, अशी मुदत वाढवितांना एकावेळी ही मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही. अशा मुदतवाढ कमाल ३ वेळा असेल. त्यानंतर उमेदवाराची पुन:श्च नियुक्ती करणे आवश्यक असे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास, त्या उमेदवारास पुन:श्च निवड प्रक्रियेस नव्याने सामोरे जावे लागेल.
१४. नियुक्तीच्या वेळी संबंधितांबरोबर विहित प्रपत्रात करार करतील. कराराचे विहित प्रपत्र **परिशिष्ट-ब** मध्ये देण्यात आले आहे.
१५. करार पध्दतीने नेमणूक केलेल्या अधिकाऱ्यांना एकत्रित मानधन, अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चा व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाही.
१६. शासन निर्णय दि.३० जुलै, २०११ व त्यासोबतचे **परिशिष्ट अ** मधील, तसेच **परिशिष्ट ब** मधील संभाव्य करारनाम्यातील, तसेच शासन वेळोवेळी सुधारीत करेल अशा अटी व शर्ती लागू राहतील.
१७. वरील पदावर करावाची नेमणूकही पुर्णत: कंत्राटी स्वरुपाची असून, निवड झालेल्या उमेदवारास विद्यापीठाच्या सेवेत हक्क सांगता येणार नाही.
१८. नियुक्त उमेदवारास कोणतीही आगाऊ सूचना व कारण न देता कामावरुन कमी करण्याचा अथवा त्यांची सेवा खंडित करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.
१९. प्रतिमाह मोबदल्याबाबत कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.
२०. उमेदवाराची निवड झाल्यानंतर विद्यापीठात रूजू होण्यापूर्वी रु.१००/- च्या गैरन्यायिक मुद्रांकावर विहित नमुन्यातील करारनामा लिहून देणे बंधनकारक राहील, त्याशिवाय कामावर रुजू करुन घेतले जाणार नाही.
२१. नियुक्त झालेल्या उमेदवाराचे नियुक्ती कालावधीत कामाचे मुल्यमापनात त्याचे काम समाधानकारक असल्यास पुनर्नियुक्तीबाबत विचार करण्यात येईल.

स्थळ :- जळगांव.
जा.क्र.कबचौउमवि/३/कंत्राटी-३/१२४८/२०२४,
दि.२३/०७/२०२४

(डॉ.विनोद प्र.पाटील)
कुलसचिव

## जाहिरात क्र.कंत्राटी-०५/२०२४
## थेट मुलाखतीचे (Walk-in-Interview) वेळापत्रक

**मुलाखतीचे स्थळ :- कक्ष क्रमांक ४०१, तिसरा मजला, विद्यापीठ प्रशासकीय ईमारत, व्यवस्थापन परिषद सभागृह कबचौउमवि, जळगांव.**

| अ.क्र. | पद | पदसंख्या | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | महिला वैद्यकिय अधिकारी For B.A.M.S. | १ | **बुधवार दि.३१/०७/२०२४<br>वेळ : दुपारी २.०० वाजता** |
| २ | ESD | १ | |

सही/-
**(डॉ.विनोद प्र.पाटील)**
**कुलसचिव**